# INDIA @75

**Editor**

**Dr. Sandip B. Kale**

**Aadhar Publications, Amaravati**

Sakri (Dhule)

PRINCIPAL
T.S.S's Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Scanned with OKEN Scanner

# INDIA@75

■ **Dr. Sandip B. Kale**

■ ***First published,* – : 15th August – 2022.**

© **Editor**

■ **Published by**

Prof. Virag Gawande for

Aadhar Publications,

Behind Govt. VISH,

New Hanuman Nagar,

Amravati – 444 604.

■ **Printed by**

Aadhar Publications,

■ Notice

**The editor, publisher, owner, printer will not be responsible for the articles published in this issue. The articles published in this issue are the personal views of the authors.**

■ Price : 400/-

■ **ISBN**- 978-93-91305-60-4

Sakri (Dhule)

PRINCIPAL

Smt. V.U.Patil Arts &

Dr.B.S.Desale Science College

Sakri, Tal Sakri, Dist Dhule

Scanned with OKEN Scanner

# पंतप्रधान राजीव गांधीं : विकासदृष्टी व आव्हानांचे ऐतिहासिक अवलोकन

डॉ. शरद बाबुराव सोनवणे

सहयोगी प्राध्यापक – राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री जि.धुळे – ४२४३०४,

भ्र.ध्वनी – ९४०५१०८१३५,ई-मेल – sharadpolsci@gmail.com

---

## प्रस्तावना

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरुवातीच्या काळात काँग्रेस पक्ष भारतीय राजकारणाच्या केंद्रस्थानी होता. केंद्रात व बहुतांश राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाचेच शासन होते. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा भारतीय जनमाणसांवर असलेला प्रभाव, इंदिरा गांधी यांचे कणखर नेतृत्व यामुळे भारतीय राजकारणात काँग्रेसचे एकपक्षीय वर्चस्व प्रस्थापित झाले होते. असे असले तरी पंडित नेहरू व इंदिरा गांधी यांच्या काळात देखील काँग्रेस पक्षाला 50 टक्के मते मिळाली नव्हती, तो करिष्मा 1984 च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत राजीव गांधी यांनी करून दाखविला. अर्थात काँग्रेसच्या या नेत्रदीपक यशाला इंदिरा गांधींच्या हत्तेमुळे निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेची किनार देखील होती. असे असले तरी राजीव गांधींच्या वैयक्तिक मेहनतीचा वाटा देखील काँग्रेसच्या या यशात होताच, हे वास्तव देखील नाकारता येणार नाही. आठव्या लोकसभा निवडणुकीनंतर राजीव गांधी हे पंतप्रधानपदी विराजमान होताच त्यांनी अतिशय दूरदृष्टीने योजना आखून भारताला विकासाच्या दृष्टीने अग्रेसर करण्याचा प्रयत्न केला. मात्र अल्पावधीतच राजीव गांधी यांची कोंडी करणारी अनेक आव्हाने निर्माण झाली आणि त्यावर मात करण्यात ते अपयशी ठरले. परिणामी 1989 मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले नाही आणि काँग्रेसला सत्तेतून पायउतार व्हावे लागले. या संपूर्ण राजकीय वाटचालीचा व राजीव गांधी यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीचा चिकित्सक वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

## आठव्या लोकसभा निवडणूकीत काँग्रेसचे नेत्रदीपक यश

आठव्या लोकसभेसाठी 24 आणि 27 डिसेंबर 1984 रोजी निवडणूक संपन्न झाली. देशभर राजीव गांधींच्या बाजूने लाट होती. या लाटेत काँग्रेसने

Sakri (Dhule)

PRINCIPAL
K.S.S's. Smt.V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule

Scanned with OKEN Scanner

लोकसभेच्या 543 पैकी 415 जागा जिंकल्या. इतका मोठा विजय पंडित नेहरू किंवा इंदिराजींना देखिल मिळवता आला नव्हता. इंदिजींच्या हत्येमुळे पसरलेल्या सहानुभूतीच्या लाटेवर स्वार होत मिळालेल्या घवघवीत यशात राजीव गांधींच्या व्यक्तीगत मेहनतीचाही महत्वाचा वाटा होता.[1] यावेळी कॉंग्रेस पक्षाने राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखाली लोकसभेच्या तीन चतुर्थांश पेक्षा अधिक जागा जिंकल्या. 'या निवडणूकीत पहिल्यांदा बहुमत प्राप्त करणाऱ्या पक्षाला देशातील एकूण मतदानांच्या 50 टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळाली होती. यापूर्वीच्या कोणत्याही निवडणूकीत सत्ताधारी पक्षाला, मग तो कॉंग्रेस असो की जनता पार्टी 50 टक्के मते मिळाली नव्हती. या अर्थाने 1984 च्या निवडणूकीनंतर स्थापन झालेले कॉंग्रेस सरकार हे देशातील पाहिले असे लोकसरकार होते; की ज्याला एकूण मतदारांचा पूर्ण विश्वास व समर्थन प्राप्त झाले होते.'[2]

या निवडणूकीत जनसंघाचा नवा अवतार असलेल्या भाजपला केवळ दोन जागा मिळाल्या. तर तेलगु अस्मितेच्या मुद्द्यावर 1982 साली स्थापन झालेल्या एन. टी. रामाराव यांच्या 'तेलगू देसम' या पक्षाला 28 जागा मिळाल्या व तो लोकसभेतील सर्वात मोठा विरोधी पक्ष ठरला. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला 22 तर भारतीय कम्युनिस्ट पक्षाला 6 जागा मिळाल्या. जनता पक्षाला केवळ 10 जागा मिळाल्या. या निवडणूकीत तामिळनाडूमध्ये कॉंग्रेस-अण्णा द्रमुक युतीला 38 पैकी 37 जागा मिळाल्या. परंतू पंजाब व आसाममध्ये 1985 झालेल्या निवडणूकीत अकाली दल व आसाम गण परिषद हे प्रादेशिक पक्ष प्रभावी ठरले.

### पंतप्रधान राजीव गांधींची कारकिर्द

राजीव गांधी पंतप्रधानपदी विराजमान होताच त्यांनी अतिशय धोरणीपणाने एखादया मातब्बर राजकारण्याप्रमाणे आपल्या करकिर्दीची सुरूवात केली. पंतप्रधानपदी बसलेला हा कर्तव्यदक्ष व्यक्ती केवळ कामाबद्दल बोलत असे आणि आपल्या कर्तव्यांशी प्रामाणिक होता म्हणून लोक त्यांना 'मिस्टर क्लीन' म्हणू लागले. 'एक प्रधानमंत्री म्हणून राजीव गांधीच्या कारकीर्दीवर दृष्टीक्षेप टाकल्यास असे म्हणता येईल की, जवळजवळ दोन वर्षाहून अधिक काळ राजीव गांधीनी आपल्यापुरते 'गैर' असे काही केले नाही; तसे ते



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.S.S's Smt. H.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri Tal.Sakri Dist.Dhule
Scanned with OKEN Scanner

करू ही शकले नाहीत. त्यानंतर मात्र त्यांच्या हातून 'योग्य' असे काहीच घडले नाही किंवा त्यांनी ते केलेही नाही. आपल्या कारकीर्दीच्या सुरूवातीला त्यांनी हिमालयाची उंची गाठली. पण नंतर ते इतके खाली आले की, त्यांच्या अधःपतनाची पातळी मनाला खिन्नता आणणारी होती. नोव्हेंबर 1989 मध्ये झालेला त्यांचा निवडणूकीतील दारूण पराभव हा त्याचा कळस होता.'[3]

राजीव गांधी : तंत्रज्ञान विकासाचे राजकारण

सुरूवातीपासूनच राजीव गांधी हे तंत्रज्ञान प्रेमी असल्यामुळे देशात दीर्घकाळापासून प्रलंबित प्रश्नांची उकल विज्ञान तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लवकर होऊ शकते यावर त्यांचा विश्वास होता. आपल्या कारकीर्दीत संजय गांधीच्या खास अनुयांयाना प्रोत्साहन देण्याऐवजी त्यांनी जाणीपूर्वक देशी परदेशी विद्यापीठात व विविध प्रकारच्या व्यवसायात विशेष गुणवत्ता संपादन करणाऱ्यांना आणि ज्यांच्या अंगी विशेष व्यावसायिक कौशल्ये आहे अशा व्यक्तींना निवडले. या निवडप्रक्रियेत सॅम पिट्रोदा, अरूण सिंग, अरूण नेहरू, मणिशंकर अय्यर यासारखे काही लोक राजीव सरकारचे अग्रदूत ठरले.[4]

भारताच्या दूरसंचार क्षेत्रातही राजीव गांधीनीं चिरंतन ठसा उमटवला. पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर त्यांनी पोस्ट व टेलिग्राफ विभागाच्या सल्लागारपदी विख्यात संशोधक, संचार अभियंते व उद्योजक सॅम पिट्रोदांची नियुक्ती केली. पिट्रोदांनी लगेच 'सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ टेलिमॅटिक्स' (सी-डॉट) ची स्थापना केली. जिथे वातानुकूलित वातावरणाची आवश्यकता नाही, अशा ग्रामीण भागात, स्वंयचलित टेलिफोन एक्सचेंजेस व स्वस्त स्विचेसची निर्मीती पुढल्या काही वर्षात सी-डॉट'ने केली. 2000 पर्यंत भारताची 48 टक्के स्विचिंग कपॅसिटी म्हणजे 14.5 दशलक्ष टेलिफोन लाईन्स कार्यरत करण्यात सी-डॉट यशस्वी ठरले.[5]

संगणकयुगाच्या नव्या धोरणाचा प्रारंभही याचकाळात झाला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या पाच महत्वाकांक्षी मोहिमा राजीव गांधीनी सुरू केल्या. एकविसाव्या शतकापर्यंत देशाच्या प्रत्येक शाळेत संगणक आला पाहिजे, हे ध्येय राजीव गांधीनी उराशी बाळगले होते. सिताराम केसरींसारखे कॉंग्रेसचे जुनेजाणते नेते' राजीवच्या या प्रयत्नांची खाजगी चर्चेत उपहासाने खिल्ली उडवायचे. ग्रामीण भारतांच्या खेड्यापाड्यात अजून वीज पोहोचलेली नाही,

Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule



Scanned with OKEN Scanner

शाळेत पुरेसे खडू-फळे नाहीत, अशा काळात राजीव कम्प्युटर्सचा विचार तरी कसा करू शकतात? असे केसरी म्हणायचे. तरीही या टिकेची पर्वा न करता वेगाने प्रगती करत एकविसाव्या शतकात कम्प्युटर्स सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात भारत खरोखर पोहचला. बिझिनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग (बीपीओ) उद्योगात जगात भारताचे वर्चस्व प्रस्थापित झाले. राजीव गांधींच्या स्वप्नांकित ध्येयांचे महत्व तेव्हाच सर्वांना जाणवले.[6]

शहाबानो प्रकारणाचे राजकारण

सर्वोच्च न्यायालयात मोहम्मद अहमद खान विरूध्द शहाबानो बेगम या खटल्यासंदर्भातील अपिलात निकाल देतांना मुस्लिम महिला शहाबानो यांना क्रिमीनल प्रोसिजर कोडच्या 125 व्या कलमानुसार पोटगी मागण्याचा हक्क आहे, असा निकाल न्यायालयाने 23 एप्रिल 1985 रोजी दिला. प्रस्तुत निकालात सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम वैयक्तिक कायदयांचा उहापोह करतांना राज्यघटनेच्या कलम 44 नुसार भारतीय नागरिकांना समान नागरी संहिता असावी अशी भावनाही व्यक्त केली.[7] सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय बाहेर पडताच राजीव गांधीची पहिली उत्स्फूर्त प्रतिक्रिया निर्णयाच्या बाजुने आली. सरकारने तो निर्णय उचलून धरावा असे त्यांचे मत होते; पण त्यानंतर विशेष वेळ न दवडता त्यांनी पलटी खाल्ली. त्यांच्या पक्षातील व पक्षाबाहेरील मुसलमान पुढऱ्यांच्या दबावाखाली येऊन त्यांनी बाजु बदलल्याचे स्पष्ट दिसले.[8]

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर तीन महिन्यांनी एक संसद सदस्य जी.एम बनातवाला यांनी एक खाजगी विधेयक संसदेत मांडून, 'सीपीसी कलम 125' हे मुस्लिमांसाठी लागू नसावे अशी मागणी केली. सभागृहात केंद्रीय गृहराज्यमंत्री आरिफ मोहम्मद खान यांनी या खाजगी विधेयकाला विरोध केला. त्यांनी राष्टवादी मुसलमान व इस्लाम कायदयाचे विद्वान मौलाना आझाद यांच्या विचारांचा दाखला देऊन घटस्फोटित मुस्लिम महिलांच्या अधिकाराचे समर्थन केले. यावेळेपर्यंत आरिफ मोहम्मद खान यांना पंतप्रधान राजीव गांधींचे समर्थन होते. तसेच कॉंग्रेसने विरोध केल्यामुळे हे खाजगी विधेयक नामंजुर झाले. परंतू अल्पावधीतच कट्टरपंथी मुसलमानांचा राजीव गांधींवर दबाव वाढल्यामुळे त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय फेटाळून लावण्यासाठी संसदेत कायदा करण्याचा प्रतिगामी निर्णय घेतला.

Sakri (Dhule)
PRINCIPAL
Scanned with OKEN Scanner

राजकीय स्वार्थ व भीतीपोटी राजीव गांधींच्या सरकारने फेब्रुवारी 1986 रोजी संसदेत "मुस्लीम वुमेन (प्रोटेक्षन ऑफ राइट्स ऑफ डायव्होर्स) ॲक्ट हा कायदा संमत करून घेतला. त्या कायदयाद्वारे मुस्लीम स्त्रियांबाबत क्रिमीनल प्रोसिजरच्या 125 व्या कलमांतर्गत केलेले खटले तहकुब केले जावेत, अशी तरतूद करून शहाबानो खटल्यातील उपरोक्त निकाल निष्प्रभ करून टाकला. त्यामुळे राजीव गांधींनी केवळ मुस्लिमांच्या तुष्टीकरणासाठी हा कायदा केला; असे आरोप विरोधकांनी त्यांच्यावर केले."[9]

**राजीव गांधीची कोंडी करणारी आव्हाने**

फार कमी वेळात उत्कर्षाच्या शिखरावर पोहचलेल्या राजीव गांधींपुढे अल्पावधीतच अनेक आव्हाने निर्माण झाली आणि त्यांचे व पर्यायाने कॉंग्रेस पक्षाचे अधोगतीकडे वाटचाल सुरू झाली. प्रादेशिक पक्षांची वाढत असलेली ताकत, भारतीय जनता पक्षाने हिंदुत्ववादी संघटनांच्या मदतीने आयोध्यत राममंदिर उभारणीच्या प्रश्नाचे केलेले राजकीय भांडवल, व्ही.पी.सिंगानी निर्माण केलेले आव्हान आणि सर्वात भयंकर म्हणजे बोफोर्स प्रकरणात राजीव गांधीवर झालेले भ्रस्टाचाराचे आरोप, यासर्वांची परिणती 1989 च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत कॉंग्रेसच्या पराभवामध्ये झाली. पुढे अनेक प्रादेशिक पक्षांचे वाढते प्राबल्य कॉंग्रेसपुढे आव्हान ठरले. राष्ट्रीय राजकारणातील नवउदयोन्मुख भाजपचे प्रमुख आव्हान होते. परिणामी राजीव गांधी यांची चोहोबाजुंनी कोंडी झाली.

**भाजपचे कट्टर हिंदूत्ववादी राजकारणाचे आव्हान**

भाजपने स्थापनेवेळी गांधींवादी समाजवादाचा स्वीकार करून एक मध्यममार्ग चोखाळण्याचा विचार केला होता. परंतू 1984 च्या निवडणूकीतील अपयशामुळे भाजपने लालकृष्ण आडवाणी यांच्या नेतृत्वाखाली कट्टर हिंदुत्ववादी राजकारणाचा मार्ग अनुसण्याचे ठरविले. त्यातच एप्रिल 1985 मध्ये उद्भवलेले शहाबानो प्रकरण भाजपच्या राजकारणाला बळ देणारे ठरले. "शहबानो प्रकरणात (राजीव गांधी) सरकारने केलेल्या चूकीत आणखी एका त्यापेक्षा गंभीर अशा चुकीची भर घातली. त्याआधी जवळजवळ 37 वर्षे न्यायालयाच्या हुकुमावरून कडीकुलपात बंदिस्त असलेल्या वादग्रस्त रामजन्मभुमी-बाबरी मशिदीच्या स्थानाची दारे सरकारने उघडली."[10] बाबरी



Sakri (Dhule)
PRINCIPAL
I.D.S's. Smt.V.N.Patil Arts & ... Dr.B.S.Desale Science College Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule
Scanned with OKEN Scanner

मशिदीची कुलपे उघडण्याचा आदेश दिल्यानंतरच्या घटनेमुळे विश्व हिंदू परिषदेचा जोर आणखीच वाढला. त्यांनी आता मशिद पाडून त्याजागी भगवान श्रीरामाचे एक भव्य मंदिर उभारण्याची मागणी सुरू केली.[11] या अनुकूल परिस्थितीचा पुरेपुर राजकीय लाभ उठविण्यासाठी "भाजपने स्वतःस आयोध्येमध्ये राममंदिर निर्माण आंदोलनामागे उभे केले होते. जसजशी या आंदोलनाची लोकप्रियता वाढत होती, त्याप्रमाणे भाजपचा उत्साह वाढत होता. भाजप कार्यकर्त्यांनी आता आरएसएस आणि विहिंप कार्यकर्त्यांसोबत राम शिलापूजन कार्यक्रमात भाग घेण्यास सुरूवात केली. या कार्यक्रमाद्वारे भविष्यात उभारल्या जाणाऱ्या राममंदिरासाठी विटा तयार करून त्याची पूजा केली जायची. या मुद्दयास अधिक भक्कमपणे मांडण्यासाठी विहिंपने 2 नोव्हेंबर रोजी आयोध्येतील वादग्रस्त जागेवर एक औपचारिक शिलान्यासाचा कार्यक्रम करणार असल्याचे जाहिर केले. निवडणूकांपूर्वी हिंदू नाराज होऊ नये म्हणून सरकारने त्यावर प्रतिबंध घातला नाही. विहिंपने शिलान्यासाच्या कार्यक्रमात पहिली विट ठेवण्यासाठी बिहारमधील एका दलित मजुराची निवड केली आणि याच जागेवर एक दिवस भगवान श्रीरामाचे भव्य मंदिर उभे राहिल असा दावा केला."[12] यामुळे हिंदू मध्यम वर्गाचा मोठा हिस्सा भाजपकडे आकर्षित झाला आणि याउलट मुस्लिमांचा काँग्रेसवरील विश्वास डळमळीत झाला.

**व्ही.पी.सिंग आणि फेअरफॅक्स व एचडीडब्ल्यू पाणबुडया प्रकरण**

राजीव गांधीच्या मंत्रिमंडळात व्ही.पी.सिंग यांच्याकडे महत्वाचे अर्थखाते होते. "अर्थमंत्री या नात्यांने त्यांनी करचूकवेगिरी करणाऱ्या उदयोगपती व भांडवलदारांवर धाडसत्र सुरू केले होते. यात काहीजण पंतप्रधानांचे मित्र व परिचितही होते. या धाडीमुळे राजीव गांधींची अडचण तर झालीच; पण व्ही.पी.सिंगाच्या मनातील नेमक्या हेतूंबद्दल शंका व संशय निर्माण झाले. परंतु व्ही.पी.सिंगानी आपल्या प्रयत्नांना पंतप्रधान राजीव गांधीचा पूर्ण पाठिंबा असल्याचे सांगितले. तसेच अर्थखात्यांच्या या धाडींमागचा उद्देश काळया पैशाला आळा घालणे, कर चुकवणाऱ्यांना वठणीवर आणणे, विदेशी चलनाच्या विनिमयांच्या कायदेशिर तरतूदींचा भंग करणाऱ्यांना शासन करणे हा असल्याचे त्यांनी जाहीर केले."[13]

**राजीव गांधी व ग्यानी झैलसिंग यांच्यातील मतभेद**

पंतप्रधान राजीव गांधी व राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग यांच्यामधील संबंध राजीव गांधी सत्तारूढ झाल्यापासूनच विसंवादाचे राहिले. राष्ट्रपतींना भेटून



Sakri (Dhule)
PRINCIPAL
T.S.S's. Smt. V.U.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College

Scanned with OKEN Scanner

त्यांना शासन विषयक नियमित माहिती देण्याचा संकेत राजीव गांधींनी मोडला. राष्ट्रपतींना भेटण्यासाठी ते स्वतः न जाता अरूणसिंगांना पाठवित असत. काही खास सभारंभाच्या निमित्ताने राष्ट्रपती व पंतप्रधान व्यासपीठावर शेजारी बसलेले दिसत असले, तरी त्यांच्यात फारशी जवळीक नसायची. "त्या समस्येचे मुळ होते सरकारच्या पंजाबविषयक धोरणाच्या कार्यवाहीत. राजीव गांधींनी अशी समजूत करून घेतलेली होती की, सरकारने आखलेल्या कोणत्याही धोरणात ग्यांनी झैलसिंगांचा कोलदांडा अवश्य पडणार, त्यामुळे त्याबाबतीत कसलीही कल्पना राष्ट्रपतींना देण्यास राजीव गांधी नाखुश असत."[14]

बोफोर्स प्रकरण उघकीस आल्यावर जॉर्ज फर्नांडीस, चंद्रशेखर, राम जेठमलानी असे इतर अनेक विरोधक व कॉंग्रेसमधील काही असंतुष्ट भ्रष्टाचाराच्या आरोपावरून पंतप्रधानांना बडतर्फ करून त्यांच्यावर खटला भरण्याची मागणी राष्ट्रपतीकडे करत होते. त्यातच राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्यामध्ये सुरूवातीपासूनच परस्पर अविश्वास विद्यमान होता. त्यामुळे "1987 च्या मध्यास राष्ट्रपती झैलसिंग हे राजींव गांधी विरोधी कटाचे केंद्रबिंदू बनले होते. दुसऱ्यांदा राष्ट्रपती बनण्याची स्वप्नेही त्यांना पडत होती; त्या अमिषाला ते वळी पडले होते. झैलसिंगही राजीव गांधीना पंतप्रधान पदावरून काढून टाकण्याच्या तयारीत होते. परंतू व्ही.पी.सिंग जे या पदाला पर्याय होते; त्यांनी हा घाणेरडा खेळ खेळायला नकार दिला. त्यामुळे भारतात घटनात्मकदृष्ट्या निर्माण होऊ घातलेला मोठा पेचप्रसंग टळला."[15]

**जनमोर्चा, राष्ट्रीय मोर्चा व जनता दलाची स्थापना**

व्ही.पी.सिंग यांनी गांधी जयंतीच्या दिवशी अर्थात 2 ऑक्टोंबर 1987 रोजी 'जनमोर्चा' नावाचा पक्ष स्थापन केला. त्यांनी कॉंग्रेसमधील नाराज नेते अरूण नेहरू, आरिफ मंहमंद खान, वी.सी.शुक्ला, सतपाल मालिक आदिंना सोबत घेऊन हा पक्ष स्थापन केला होता. पुढे कॉंग्रेस विरोधात सात पक्षांची आघाडी होऊन 'राष्ट्रीय मोर्चा'ची स्थापना झाली. त्यानंतर 11 ऑक्टोंबर या जयप्रकाश नारायण यांच्या जन्मदिनी 1988 मध्ये जनता दलाची स्थापना झाली. हा पक्ष जनमोर्चा, कॉंग्रेस(एस), जनता पक्ष व लोकदल यांच्या विलयातून तयार झाला.

Sakri (Dhule)
PRINCIPAL
C.B.S's Smt.V.J.Patil Arts & Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule



Scanned with OKEN Scanner

सर्वसामान्य लोकांच्या मनांमध्ये चूक किंवा बरोबर कोणत्या का मार्गाने असे ना; परंतू बोफोर्स प्रकरण हे व्ही.पी.सिंग यांच्या मंत्रीपदाच्या राजीनाम्याशी जोडलेले होते. आता लोक राजीव गांधी ऐवजी त्यांना 'मिस्टन क्लीन' म्हणू लागले होते. व्ही.पी.सिंगांनी काँग्रेस सोडली आणि 1988 मध्ये संयुक्त विरोधी पक्षांकडून अलाहाबादची पोटनिवडणूक लढवली आणि या निवडणूकीत ते विजयी झाले. आता ते वाढत्या बिगर-काँग्रेसवादाचे केंद्रबिंदू बनले होते. ऑक्टोंबर 1988 मध्ये त्यांच्या जुना पक्ष 'जनमोर्चा'चा जुन्या जनता पक्षात विलय झाला. आणि 'जनता दल' या नविन पक्षाचा जन्म झाला. या नव्या पक्षाने काही प्रादेशिक पक्षांशी हात मिळवणी करून 'राष्ट्रीय मोर्चा'ची स्थापना केली. याची स्थापना मद्रासच्या 'मरीना बीच'वर झाली. राष्ट्रीय मोर्चाचे समर्थन करतांना सदाबहार आणि उत्साही नेते एन.टी.रामाराव यांनी म्हटले होते की, हा सात घोडयांचा रथ असून तो राष्ट्रीय इतिहासावर पसरलेल्या दशकांपासूनच्या अंधकारास दूर करण्याचे काम करील.[16]

**नववी लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक : गैरकाँग्रेस आघाडीचा प्रभाव**

जनता दलाची स्थापना झाल्यापासून पून्हा एकदा 'गैरकाँग्रेसवादी' काँग्रेसला पराभूत करण्यासाठी कामाला लागले होते. पूर्वीचा जनता पक्षाचा अनुभव ते विसरले नसल्यामुळे त्यांनी पक्षांचे विलिनीकरण करण्याऐवजी 'आघाडीचे राजकारण' करण्याचा निर्णय घेतला. विरोधकांच्या रणनीतिमुळे काँग्रेसला तिहेरी स्वरूपाचे आव्हान निर्माण झाले. एका बाजूने राष्ट्रीय मोर्चा, दुसऱ्या बाजूने भाजप तर तिसऱ्या बाजुला डावे या आघाडीने काँग्रेस पक्षाची 1989 च्या निवडणूकीत पूरती दमछाक केली.

राजीव गांधींनी देखिल राष्ट्रीय आघाडीला कमी न लेखता देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन 170 निवडणूक प्रचारसभा घेतल्या. परंतू "देशाच्या या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत निवडणूक प्रचारसभेत जमावाला राजीव गांधीच्या विरोधात उभे करण्यासाठी विश्वनाथ प्रताप सिंगांनी एका अनोख्या प्रचारतंत्राचा वापर केला. ते आपल्या खिशातून आपली इलेक्ट्रॉनिक पॉकेट डायरी बाहेर काढत व तिची दोन-तीन बटने दाबत लोकांना जाहिरपणे सांगत की, बोफोर्सकडून लाच म्हणून मिळालेला पैसा स्विस बँकेच्या कोणकोणत्या क्रमांकाच्या खात्यात भरला गेला आहे, त्याचा सर्व तपशील आपल्याकडे आहे.



Sakri (Dhule)
PRINCIPAL
K.B.S's. Smt. V.U. Patil Arts & Late Dr. B.S. Desale Science College
Scanned with OKEN Scanner

आपल्याला लोकांनी निवडून देऊन सत्तेवर धाडले तर 15 दिवसांत साऱ्या दोषी गुन्हेगारांना उजेडात आणु."[17] सरकारवरील भ्रस्टाचाराच्या या आरोपामुळे 1989 च्या निवडणूकीत काँग्रेसच्या जागा 1984 च्या तुलनेत निम्यापेक्षाही अधिक कमी झाल्या.

काँग्रेससाठी धक्कादायक निवडणूक निकाल

22, 24 व 26 नोव्हेंबर 1989 रोजी झालेल्या नवव्या लोकसभेच्या निवडणूकीत काँग्रेसला 197, जनता दलास 143, भाजपला 85, भाकपला 33 तर भाकप 12 जागा मिळाल्या. काँग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या; मात्र कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. राष्ट्रीय आघाडीच्या जागांची बेरीज 156 पर्यंत पोहचली. बिगर काँग्रेसवादाच्या मुद्द्यावर भाजप आणि डावे पक्ष या परस्पर विरोधकांनी राष्ट्रीय मोर्चाला बाहेरून पाठिंबा दिला. "हे राजकारण आपल्या विस्तारासाठी वापरण्याचे कसब भाजपापाशी होते. त्यामुळे 1987 ते 1996 याकाळातल्या विगरकाँग्रेसवादातून जर मुख्य काही घडले असेल, तर ते म्हणजे भाजपचा विस्तार झाला. प्रथम रामजन्मभूमीचे आंदोलन उग्र करण्याची संधी भाजपाला मिळाली व पुढे 1998 मध्ये विगरकाँग्रेसवादातून राष्ट्रीय लोकशाही आघाडी तयार झाली."[18]

समारोप

राजीव गांधी यांच्या कारकीर्दीत काँग्रेस पक्षाला सर्वोच्च असे घवघवीत यश मिळाले होते. राजीव गांधी हे पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर त्यांनी अनेक विकासाभिमुख योजना राबवून सामान्य जनतेपर्यंत व गावपातळीपर्यंत विकासाची गंगा नेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगतीला चालना देण्यासाठी विद्वान व्यक्तींना प्रोत्साहन दिले. राजीव गांधी यांच्या दूरदृष्टीमुळेच भारताने संगणक व माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केली आहे. पण असे असले तरी विज्ञानाची जाण असणाऱ्या राजीव गांधींनी शहाबानो प्रकरणात प्रतिगामी शक्तींना साथ दिल्यामुळे पुढे त्यांच्या हातून आणखी काही चुका घडल्या आणि त्याचा फायदा उचलत भाजपने आपला जनाधार वाढवला. बोफोर्स प्रकरणात राजीव गांधी यांच्यावर झालेल्या भ्रष्टाचारांच्या आरोपामुळे देखील त्यांची प्रतिमा मलीन झाली. परिणामी 1989 च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा जनाधार कमी झाला आणि



PRINCIPAL
T.S.B's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College

काँग्रेसला सत्तेतून पाय उतार व्हावे लागले. त्यानंतरच्या काळात पुन्हा काँग्रेस सत्तेवर आली असली तरी काँग्रेसला पूर्वीचे वैभव मात्र कधीच प्राप्त झाले नाही.

संदर्भ

1. किदवई रशीद, '24 अकबर रोड', अनुवाद- सुरेश भटेवरा, चिनार पब्लिशर्स, पुणे, 2013, पृ.139-140

2. सईद एस.एम., 'भारतीय राजनीतिक व्यवस्था', सुलभ प्रकाशन, लखनऊ, 2001, पृ.264

3. मलहोत्रा इंदर, 'राजीवनंतरचा भारत', अनुवाद- माधव मोर्डेकर, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, 1992, पृ.53-54

4. उपरोक्त, क्र.1, पृ.119

5. कित्ता, पृ.151

6. कित्ता, पृ.150

7. कुलकर्णी सुहास व चंपानेरकर मिलिंद, 'असा घडला भारत : 1947-2012', रोहन प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, 2013, पृ.530

8. उपरोक्त, क्र.3, पृ.63

9. उपरोक्त, क्र.7, पृ.530

10. उपरोक्त, क्र.3, पृ.63-64

11. गुहा रामचंद्र, 'भारत नेहरु के बाद', अनुवाद- सुशांत झा, पेंगुइन रैंडम इंडिया प्रा.लि., गुडगांव, 2012, पृ.242

12. कित्ता, पृ.257

13. उपरोक्त, क्र.3, पृ.67

14. कित्ता, पृ.65

15. चंद्र बिपन, मुखर्जी मृदुला व मुखर्जी आदित्य, 'इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स', अनुवाद- पारधी मा.कृ., फडके व्ही.सी., जोशी अरुण, नातु एम.वी., क्षीरसागर व्ही.एस., के'सागर पब्लिकेशन्स, पुणे, दुसरी आवृत्ती, 2006, पृ.412

16. उपरोक्त, क्र.11, पृ.258



PRINCIPAL
P.S.P's Smt. V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist Dhule

Scanned with OKEN Scanner

17. उपरोक्त, क्र.3, पृ.82

18. पळशीकर सुहास, 'भारताच्या राजकारणाचा ताळेबंद', प्रगत अध्ययन केंद्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, 2009, पृ.77

Sakri (Dhule)

PRINCIPAL
V.U.Patil Arts &
Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal Sakri, Dist.Dhule



Scanned with OKEN Scanner